SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR – 416 004 MAHARASHTRA
Phone : EPABX-2609000 Stat Cell : 0231-2609147.
Fax : 0091-231-2693294 website : www.unishivaji.ac.in
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर – ४१६ ००४ – महाराष्ट्र
दूरध्वनी: (ईपीएबीएक्स)२६०९००० सांख्यिकी कक्ष ०२३१-२६०९१४७.
फॅक्स : ००९१-२३१-२६९३२९४ E-Mail : statcell@unishivaji.ac.in
Estd : 1962
NAAC 'A++' Grade

जा.क्र./शिवाजी वि./सांख्यिकी कक्ष/जिसांका/२०२१-२२/ No 0003 दिनांक : 10 MAR 2022

# परिपत्रक

**प्रति,**
**प्राचार्य / संचालक,**
**सर्व संलग्नीत महाविद्यालये / मान्यता प्राप्त संस्था.**

**विषय : जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन सन २०२१-२२ अंतर्गत विहित नमुन्यातील माहिती उपलब्ध करुन देणेबाबत.**

**संदर्भ : जा.क्र.जिसांकासा/सांस-०१/जिसाआस-२०२२/२०२२/१५३, दि.०२/०३/२०२२ रोजीचे जिल्हा सांख्यिकी कार्यालय, सातारा यांचे पत्र.**

**महोदय/महोदया,**

उपरोक्त विषय संदर्भांकित पत्रास अनुसरून आपणास आदेशान्वये कळविण्यात येते की, दरवर्षी वरील कार्यालयाकडून जिल्हा अंतर्गत येणाऱ्या महाविद्यालयातील विद्यार्थी तसेच शिक्षकांच्या संख्येची प्रवर्गनिहाय माहिती विहित नमुन्यात देण्याबाबत कळविण्यात येते. सदरची माहिती अखिल भारतीय उच्च शिक्षण सर्वेक्षण कार्यक्रम (AISHE) या संकेतस्थळावर महाविद्यालयांनी भरलेल्या माहिती वरुन तयार करुन पाठविण्यात येते.

मध्यंतरी उद्भवलेल्या कोवीड -१९ व लॉकडाउनमुळे AISHE ने माहिती भरण्यासाठीचे सर्वेक्षण सुरू केलेले नव्हते. सध्या सन २०२०-२१ साठी AISHE या वेबपोर्टलवर माहिती नोंदविणे सुरू असून सन २०२१-२२ साठी अद्याप सर्वेक्षण सुरू झालेले नाही. सदर कारणांमुळे सांख्यिकी कक्ष संलग्नित महाविद्यालयातील वरील स्वरूपातील माहिती तुर्तास उपलब्ध करू शकलेली नाही. सदर अनुषंगाने वरील माहिती एकत्रित करण्यासाठी आपल्या महाविद्यालयांच्या Unishivaji या ई-मेल आयाडीवर गुगल फॉर्म लिंक पाठविण्यात आलेली असून सदर फॉर्ममध्ये सन २०२१-२२ मधील प्रवेशित विद्यार्थी तसेच शिक्षकांची संख्या नोंदविण्यात यावी.

महाविद्यालयांच्या प्राचार्यांनी सदर बाब आपल्या महाविद्यालयांच्या संबंधीत प्रशासकीय सेवक/कर्मचारी यांच्या निर्देशनास आणुन त्याप्रमाणे त्यांच्याकडून त्वरीत कार्यवाही करून घ्यावी ही विनंती. सदर कार्यालयास वरील माहिती दि. १५/०२/२०२२२ पूर्वी सादर करावयाची असल्याने सदर माहिती गुगल फॉर्ममध्ये लवकर नोंदवून विद्यापीठास सहकार्य करावे.

Google Form Link :- **https://forms.gle/j2xRuwCng9JaQ4k3A**

**गुगल फॉर्ममध्ये माहिती नोंद करत असता काही अडचण निर्माण झाल्यास सांख्यिकी कक्ष, (खोली क्रमांक ३१३), शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर. दुरध्वनी क्रमांक ०२३१-२६०९१४७ येथे संपर्क साधावा.**
कळावे.

आपला विश्वासू,

**प्र.कुलसचिव**